बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकः बाळासाहेब मस्के


## गायक राहत फतेह अली खान यांना अटक

दिल्लीः पाकिस्तानी गायक राहत फतेह अली खान यांना दुबईत विमानतळावर अटक करण्यात आली आहे. दुबईतल्या बुर्ज दुबई पोलीस स्टेशनमध्ये राहत फतेह अली खान यांच्या मॅनेजरने तक्रार दाखल केली होती. मॅनेजर सलमान अहमद यांच्या तक्रारीनंतर दुबई पोलिसांनी राहत फतेह अली खान यांना अटक करण्यात आली. दुबई पोलिसांनी ही कारवाई केली आहे. दुबईतील एका कॉन्सर्टवरुन गायक राहत फतेह अली खान आणि त्यांचा मॅनेजर अहमद सलमान यांच्यात वाद झाला होता. शोचं आयोजन आणि आर्थिक देवाण–घेवाणीवरुन दोघांमधील हा वाद पोलिस ठाण्यात गेला. ज्यानंतर पाकिस्तानी गायक राहत फतेह अली खान यांच्यावर कारवाई करण्यात आली. छ्ख या वृत्तसंस्थेने हे वृत्त दिलं आहे. दुबईतील शो केल्यानंतर परतत असताना दुबई पोलिसांनी थेट विमानतळावरुनच राहत फतेह अली खान यांना अटक केली आहे.


बीड | मंगळवार,दि.२३जुलै २०२४ | वर्ष३रे | अंक३५९वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३


# मोदी आणि शाहांना मराठा जात संपवायचीय?



## आंदोलन : मनोज जरांगे पाटील यांचा गंभीर आरोप



**छोट्या जातींना धरून राजकारण**

महाराष्ट्रात मराठा मोठी जात आहे. ती त्यांना संपवायची आहे. गुजरातमध्ये पटेल, तसेच यादव, राजपूत, गुर्जर, जाट, मुस्लिम, दलित अशा मोठ्या जाती संपवायच्या आहेत. ते विचित्र लोक आहेत. मोठ्या जाती संपवायच्या आणि छोट्या जातींना धरून राजकारण करायचं हा त्यांचा पणच आहे. मात्र मोठ्या जाती एकत्र आल्यावर काय होईल, हे त्यांना माहिती नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

जालना/पुण्यभूमी प्रतिनिधी

नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांना महाराष्ट्रामधून मराठा जात संपवायची आहे, असा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. तसेच जेव्हा टांगा पटली होईल, तेव्हा आमची गरज कळेल, असा इशारा दिला आहे. मराठा समाजाला ओबीसींमधून आरक्षण मिळावं, अशी मागणी लावून धरत पुन्हा एकदा उपोषणाला बसलेले मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आज एक गंभीर आरोप केला आहे. नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांना महाराष्ट्रामधून मराठा जात संपवायची आहे, असा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. तसेच जेव्हा टांगा पटली होईल, तेव्हा आमची गरज कळेल, असा इशारा दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण स्थळावरून आज प्रसारमाध्यमांशी संवाद साधत असताना माध्यमांनी त्यांना अमित शाह यांनी रविवारी पुण्यामधील भाजपाच्या मेळाव्यात केलेल्या भाषणाबाबत प्रतिक्रिया विचारली. तेव्हा मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ते काय लक्ष घालणार? ते मोठे लोक आहेत. गरीबांकडे लक्ष द्यायला त्यांना कुठे वेळ आहे.

जेव्हा टांगे पलटी होतील तेव्हा कळणार आहे. त्यांना केवळ सत्ता स्थापन करेपर्यंत गरीबांची गरज होती. सत्ता स्थापन केल्यावर त्यांनी गरीबांवर लाथ मारलीय. आता मोठे मोठे कावळे ओळखीचे झालेत त्यांच्या त्यांना धरून आहेत ते, अशी टीका जरांगे पाटील यांनी केली. ते पुढे म्हणाले की, नरेंद्र मोदी हे शिर्डीला आले होते तेव्हा त्यांना आरक्षणाच्या प्रश्नामध्ये लक्ष घाला, असं आवाहन आम्ही केलं होतं. मात्र त्यांनी लक्ष घातलं नाही. लोकांचे मुडदे पाडणारे लोक आहेत ते. त्यांचा केवळ चेहरा माणसाचा आहे. ते आतमधून कपटाने भरलेले आहेत. त्यांचं काही खरं नाही. ते गरिबाला कधीच मोठं करणार नाहीत. त्यांना देशातील मोठ्या जाती संपवायच्या आहेत.

## मनोज जरांगेंच्या मागे शरद पवारच?

खळबळ: भाजप आमदार परिणय फुके यांचा आरोप

नागपूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

मनोज जरांगे यांच्या मागे शरद पवार यांचा हात आहे. हे सर्व षडयंत्र शरद पवार यांनीच रचले आहे. जरांगे यांना मराठा समाजाला आरक्षण द्यायचे नाही, तसेच शरद पवार यांनाही आरक्षण द्यायचे नाही, असा आरोप भाजपचे आ. डॉ. परिणय फुके यांनी केला. नागपुरात पत्रकारांशी बोलताना आ. फुके म्हणाले, शरद पवार यांना फक्त ओबीसी आणि मराठा यांच्यामध्ये भांडण लावायचे आहे. आता सामान्य माणसाला हे स्पष्ट झाले आहे की, जरांगे कुणाची सुपारी वाजवत आहेत. ज्यांच्याकडून काही भेटत आहे, त्यांच्यावर जरांगे हे आरोप करणारच नाही. जरांगे यांच्या सर्व भूमिका संशयास्पद आहेत. मराठा समाजाला संवैधानिक आरक्षण देण्यासाठी महायुती सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे. मात्र, त्यानंतरही जरांगे हे शरद पवार यांच्या इशाऱ्यावर दोन समाजांत वितुष्ट निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत, असा आरोपही फुके यांनी केला.



## ग्रामीण दौरा, शहरासंबंधी प्रश्नावर बैठक

आ.संदीप क्षीरसागर: नगरपालिकेची आढावा बैठक



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आ.संदीप क्षीरसागर यांनी शहर आणि ग्रामीण भागाचा एकाच दिवशी दौरा करत सोमवारी (दि.२२) रोजी नाळवंडी सर्कलमध्ये विकासकामाचे भूमीपूजन केले. तसेच नगरपालिकेच्या अधिकार्यांसमवेत बैठक घेऊन शहरातील स्वच्छतेसंबंधी तसेच इतर महत्त्वाच्या विषयांवर सक्त निर्देश दिले. बीड तालुक्यातील नाळवंडी सर्कलमध्ये धनगरवस्ती येथील श्री.बिरोबा देवस्थानच्या सभामंडपाच्या कामाचे आ.संदीप क्षीरसागर यांनी भूमिपूजन केले. तसेच या भागातील वाडी–वस्तींवर जाऊन नागरिकांशी आ.क्षीरसागर यांनी संवाद साधला. यासोबतच शहरातील अतिशय महत्त्वाचा असलेला स्वच्छतेच्या प्रश्नाविषयी नगरपालिकेच्या अधिकार्यांसोबत आ.संदीप क्षीरसागर यांनी बैठक घेतली. शहरात पावसाळ्यापूर्वी नालेसफाई आणि स्वच्छतेची कामे झालेली नाहीत. त्यामुळे अनेक रोग उद्भवण्याची शक्यता असून या पार्श्वभूमीवर रोगप्रतिबंधक फवारणी करा. स्वच्छता निरीक्षक यांच्यामार्फत प्रभागनिहाय स्वच्छता आणि कचरा जमा करण्याचे काम वेळच्या वेळी करा. पाणीपुरवठा नियमित करा. शहरातील रस्त्यांवर खांबावरील बंद असलेल्या दिव्यांची दुरुस्ती करा. असे निर्देश यावेळी नगरपालिकेच्या अधिकार्यांना आ.क्षीरसागर यांनी दिले. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, नगरपालिकेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे, संबंधित विभागाचे अभियंते व अधिकारी तसेच नागरिक उपस्थित होते.



**परळी : वंचितचे अध्यक्ष ड. बाळासाहेब आंबेडकर यांची राजेभाऊ फड यांनी सदिच्छा भेट घेतली.असता परळी विधानसभा मतदारसंघा बाबत सविस्तर चर्चा केली.**

## मनसेही विधानसभा निवडणूक लढवणार!

पडघम : राज ठाकरेंच्या शिलेदाराने सांगितली रणनीती



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीतून माघार घेतलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण पक्षाने आगामी विधानसभा निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. जागावाटप आणि मतदारसंघातील पक्षबांधणीकरता पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या जात असून रणनीती आखली जात आहे. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षमेळावा घेतला होता. या मेळाव्यात २०० ते २१५ जागा लढणार असल्याचं पदाधिकाऱ्यांना सांगितल्याचं मनसे नेते प्रकाश

पान २ वर...

## शिक्षकांच्या जागा भरण्याचे आदेश

दिलासा : जयदत्त क्षीरसागर यांच्या मागणीची दखल



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्हा परिषद अंतर्गत पद भरतीपुर्वी कार्यरत असलेल्या शिक्षकांमधुन विषय शिक्षकांच्या रिक्त पदावर तातडीने नियुक्त्या करण्याचे आदेश शिक्षण संचालक प्राथमिक विभाग यांनी दिले असुन या जागा भरण्यात याव्यात यासाठी प्रहार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या पदाधिकारी यांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची भेट घेवून रिक्त पदे भरण्याची मागणी केली होती. माजी मंत्री क्षीरसागर यांनी शिक्षण संचालक यांना तातडीने पाठपुरावा करून बीड जिल्हा परिषद अंतर्गत रिक्त पदावर नियुक्त्या कराव्यात अशी मागणी केली होती.त्यानुसार आता या जागा भरण्याची प्रक्रिया होणार आहे.

बीड जिल्ह्यात जळवपास ४५० विषय शिक्षक ज्यात गणित,विज्ञानची रिक्त पदे आहेत.त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. सन २०१४ पासून प्राथमिक पदवीधर पदोन्नती प्रक्रिया राबवण्यात आलेली नाही. परिणामी ग्रामीण भागात उच्च प्राथमिक शिक्षणाचे विद्यार्थ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.ही बाब संघटनेचे जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी आणि पदाधिकारी यांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची भेट घेवून ही बाब निदर्शनास आणून दिली. शिक्षण संचालक

पान २ वर...

# प्रकाश आंबेडकरांची मोठी खेळी

**भूमिका** | **भुजबळांना ओबीसी यात्रेचं निमंत्रण**



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात मराठा आणि ओबीसी समाजामध्ये संघर्ष सुरू असलेला पाहायला मिळत आहे. मराठा समाजाचे नेतृत्त्व करणारे मनोज जरांगे हे २० जुलैपासून उपोषणाल बसले आहेत. उपोषणाचा दिसरा दिवस आहे. सगेसोयऱ्यांच्या मागणीवर ते ठाम आहेत. तर दुसरीकडे ओबीसी नेते याचा कडाडून विरोध करत आहेत. अशातच वंचित बहुजन आघाडीच्या प्रकाश आंबेडकर यांनी मोठी खेळी केली आहे. राज्यात जेव्हा मराठा आणि ओबीसी समाजाकडून आंदोलन सुरू असताना आंदोलनाच्या ठिकाणी त्यांनी भेट दिली होती. मात्र आता प्रकाश आंबेडकर यांनी ओबीसी बचाव यात्रा काढण्याचं जाहीर केलं आहे. विशेष म्हणजे या यात्रेला आंबेडकरांनी मंत्री छगन भुजबळ यांना निमंत्रण दिलं आहे. ओबीसी आरक्षण बचाव यात्रा २५ जुलैला चैत्यभूमी, मुंबई येथून सुरू होणार असून त्याच दिवशी पुण्यातील महात्मा फुले वाड्यालाही भेट देण्यात येणार आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यातून ही यात्रा जाणार आहे. तसेच, ओबीसी आरक्षण बचाव यात्रेत सहभागी होणाऱ्यासाठी ओबीसी आंदोलकांसह, महाराष्ट्रातील काही बड्या नेत्यांनाही निमंत्रण पाठवण्यात येणार असल्याची माहिती आहे.मराठा आरक्षणाचा मुद्दा चिघळला होता, मनोज जरांगे यांनी चलो मुंबईचा नारा देत मराठा समाजासह मुंबईच्या दिशेने निघाले होते. त्यावेळी ओबीसी समाजाकडून छगन भुजबळ यांनी विरोध करत जरांगे यांच्यावर टीका केलेली. दोघांमध्ये वाकयुद्ध सुरू होतं, दोघेही एकमेकांवर एकेरी भाषेत बोलत खोचक अशा टीका करत होते ज्या अजुनही सुरू आहेत. मराठा समाजाला आरक्षण द्या पण ओबीसींमधून न देता वेगळे द्या आमचा त्याला विरोध नसल्याची छगन भुजबळ यांची भूमिका आहे. पण आता मराठा समाजाला सगेसोयऱ्यांची मागणीसाठी जरांगे माघार घ्यायला तयार नाहीत. त्यामुळे आता वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे.छगन भुजबळ यांनी शरद पवार यांची भेट घेत यामध्ये मध्यस्थी करण्याची विनंती केली. आम्हाला विचारून तुम्ही त्यांना वचने दिली नसल्याचं पवार स्पष्ट म्हणाले. परंतु पवारांची मनधरणी करण्यात राज्य सरकारला यश आलं असून सर्वपक्षीय बैठक घेणार असल्याची

पान २ वर...

## केज पोलिसांची राहतेय करडी नजर!

पोनि प्रशांत महाजन : सामाजिक बंधुभाव अबाधित ठेवा



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

सध्या सोशल मिडीयात विशालगड (गजापूर) प्रकरणातील अतिरंजित व आक्षेपार्ह व्हिडिओ काही युवक दोन्ही बाजूंनी प्रसारित करत आहेत. अशा व्हिडिओज् मधून हिंदू मुस्लिम समाजात अशांतता पसरण्याचा व जातीय तेढ निर्माण होण्याचा संभव आहे. आपल्या पोलीस स्टेशन हद्दीत आणि बीड जिल्हा मध्ये कुणीही युवक या प्रकरणातील आक्षेपार्ह व्हिडिओज्,फोटोज् शेअर करणार नाहीत तसेच जातीय तणाव निर्माण करणारे संदेश सोशल मिडीयात प्रसारित करणार नाहीत याबद्दल खबरदारीचे संदेश स्थानिक पातळीवर सर्वांनी द्यावे जेणेकरून बीड जिल्हा मध्ये शांतता राहील तसेच जे कोणी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न जे करणार त्यावर निश्चित कारवाई होईल.कारण तांत्रिक बाबीमुळे सदर अशांतता कोणी पसरवली याबाबत सखोल तपास करून निष्पन्न होत असते. त्यामुळे प्रत्येकाने आपली सामाजिक जबाबदारी ओळखून आपल्या प्रतिष्ठेला बाधा येणार नाही याची जाणीव ठेवून सर्वांनी काळजी घ्यावी. काही असामाजिक तत्व समाजात शांतता राहू नये यासाठी समाजाला बाधक कृत्यकरत असतात त्यावर सर्व सामान्य नागरिकांनी लक्ष ठेवावे अशा बाधक कृत्य करणारे कोणीही असो

पान २ वर...

# वंगदेशी विद्यार्थ्यांचा विद्रोह

बांगलादेशातील विद्यार्थ्यांचे आंदोलन तेथील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळेच शमण्याची चिन्हे रविवारी दिसली. मात्र तोवर या आंदोलनातील हिंसाचारात शंभरहून अधिक बळी गेले असून अजूनही राजधानी ढाका आणि अन्यत्र संचारबंदी आहे. कोणत्याही देशात विद्यार्थीच जेव्हा रस्त्यावर येतात तेव्हा त्या आंदोलनास हाताळणे आव्हान असते. तारुण्यसुलभ प्रक्षोभ अनावर असतो. त्यामागील कारणे किती योग्य–अयोग्य हा मुद्दा वेगळा आणि ती हिंसक मार्गाने व्यक्त व्हावीत का ही बाब वेगळी. इतका विवेक त्या वयात असतोच असे नाही आणि ही बाब समर्थनीय आहे असेही नाही. अशी आंदोलने शांत करण्यासाठी एक तर समंजस नेतृत्व हवे किंवा दुसरे टोकाचे–आणि अत्यंत निंद्य– उदाहरण म्हणजे ते चीनच्या डेंग शियाओपिग यांच्याप्रमाणे हवे. त्यांनी १९८९ साली त्या देशातील विद्यार्थ्यांचे आंदोलन तिआनान्मेन चौकात अत्यंत निर्घृणपणे चिरडले. त्या आंदोलनात रणगाडय़ासमोर छातीचा कोट करून आव्हान देणाऱ्या मुलाची छबी हीच डेंग यांची ओळख बनली. त्यांनी भले चीनचा आर्थिक विकास केला हे सत्य असेल. पण डेंग म्हणजे तिआनान्मेन हेच सत्य अनेकांस माहीत असते. त्यामुळे आपले असे काही होऊ नये असे पंतप्रधान शेख हसीना यांस वाटत असेल तर हे आंदोलन त्यांना अत्यंत संयमाने हाताळावे लागेल. हे अवघड. कारण शेख हसीना या काही लोकशाही मूल्यांच्या समर्थक वगैरे मानल्या जात नाहीत. यंदाच्या जानेवारीत त्या चौथ्यांदा सत्तेवर आल्या. विरोधकांस तुरुंगात डांबल्यानंतर झालेल्या या 'निवडणुकीत' त्यांना उत्तम 'यश' मिळाले. तेव्हा हे आंदोलन हाताळण्यात त्यांची खरी कसोटी असेल.कारण या आंदोलनाचा विषय त्यांना सत्तेप्रमाणे वारसाहक्काने मिळालेला आहे. झाले ते असे की १९७१ साली निर्मितीनंतर तेव्हाचे पंतप्रधान आणि नव्या बांगलादेशाचे निर्माते शेख मुजीबुर रहमान यांनी एक निर्णय घेतला. त्या वेळी हा देश समग्र गरीब होता आणि आर्थिक विकासाची कोणतीही साधने त्यापाशी नव्हती. भारताच्या इंदिरा गांधी यांनी योग्य वेळी केलेली धाडसी आणि सक्रिय मदत या देशाच्या निर्मितीत महत्त्वाची ठरली. त्या वेळी या देशाच्या मुक्तिलढय़ात सहभागींना शेख मुजीब काही देऊ शकत नव्हते. म्हणून त्यांनी नवा देश निर्माण होत असताना त्यात मदत करणाऱ्यांस शासकीय सेवेत आरक्षण देण्याची घोषणा केली. हे आरक्षण ३० टक्के इतके होते. यात लक्षात घ्यावा असा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा असा की बांगलादेश लढय़ातील 'मुक्तिवाहिनी' ही काही आखीव–रेखीव, गणवेशीय संघटना नव्हती. त्यामुळे या वाहिनीत नक्की कोणाचा किती व कसा सहभाग होता आणि तो मोजण्याचे मापदंड काय, हे ठरवणे आणि त्यांना आरक्षण देणे अवघड होते. सबब ते ठरवले गेलेच नाही. पण नव्या देशनिर्मितीच्या उत्साहात ही बाब दुर्लक्षिली गेली आणि ती कोणास इतकी टोचलीही नाही. पुढे ७५ साली शेख यांची हत्या झाली आणि काही काळ बांगलादेश राजकीय अस्थिरतेत सापडला. शेख मुजीब यांचा राजकीय वारसा त्यांच्या कन्येने– म्हणजे विद्यमान पंतप्रधान शेख हसीना– पुढे चालवला. शेख मुजीब यांच्या हत्येनंतर काही काळ जनरल झिया उर रहेमान यांची लष्करशाहीदेखील त्या देशाने अनुभवली. बांगलादेशातील मुख्य विरोधी नेत्या बेगम खालिदा या झिया उर रहेमान यांच्या पत्नी. पंतप्रधान शेख हसीना यांस आव्हान देणाऱ्या या बेगम सध्या तुरुंगात आहेत. याचा अर्थ बांगलादेशातील राजकारण संस्थापकाची कन्या आणि लष्करशहाची पत्नी यांच्या भोवती फिरत असून त्यापासून बांगलादेशीयांस सध्या तरी 'मुक्ती' दिसत नाही.हे लक्षात घेतल्यास विद्यार्थ्यांच्या मनातील रोषाचा अर्थ लावता येईल. ही खास तिसऱ्या जगातील भेदकारी लक्षणे. आर्थिक मुद्दय़ांस महत्त्व द्यावयाचे नाही आणि दिले तरी त्याचे श्रेय आपल्या खात्यात जमा होईल याची खातरजमा सतत करत राहावयाची, हे या तिसऱ्या जगातील राजकीय दारिद्रय़! म्हणजे विरोधात असताना 'जीएसटी' रोखून धरायचा आणि सत्ता हाती आली की 'जीएसटी', 'जीएसटी' करत त्याच्या 'यशा'चे श्रेय घ्यायचे! या असल्या राजकारणाने अनेक महत्त्वाच्या आर्थिक विषयांचा खोळंबा होतो आणि समाजातील अस्वस्थता वाढत जाते. बांगलादेशातही नेमके असेच झालेले आहे. तयार कपडे आदी उद्योग सोडले तर त्या देशास म्हणावा असा औद्योगिक विकास साधता आलेला नाही. पंतप्रधान शेख हसीना जवळपास दीड दशकांहून अधिक काळ सत्तेवर आहेत. या काळात आपण विरोधकांच्या कशा मुसक्या आवळल्या आणि त्यांना कसे नामोहरम केले याचेच त्यांना कौतुक आणि हेच त्यांचे यश. वास्तविक आपणास मिळालेले राजकीय यश देशाच्या औद्योगिक, आर्थिक प्रगतीत रूपांतरित करता आले असते तर हा आरक्षणाचा मुद्दा इतका प्रक्षोभक होता ना. पण ते त्यांना जमले नाही आणि त्यांनी त्याकडे पुरेसे लक्षही दिले नाही. हेही पुन्हा तिसऱ्या जगातील नेतृत्वाचे खुजेपण.अशा देशांत त्यामुळे सरकारी सेवा हाच अनेकांचा आशेचा किरण ठरतो. शेती विकासात जमिनींच्या मर्यादेमुळे येणाऱ्या मर्यादा आणि त्याच वेळी रुतलेला औद्योगिक विकास हीच मुळात पुरेशी स्फोटक परिस्थिती. आणि तीस उपलब्ध संधींतील वाढत्या आरक्षणाची जोड मिळाली तर या स्फोटक परिस्थितीस वात लावली जाते आणि परिस्थितीचा भडका उडतो. तसे झाले की काय होते हे जळत्या बांगलादेशावरून कळेल. त्यामुळे आर्थिक विकास, औद्योगिकीकरण, प्रचंड गतीने रोजगार संधी यांस पर्याय नाही. वंगदेशी विद्यार्थ्यांच्या विद्रोहाचा हा अर्थ.

# महाराष्ट्राच्या मनातील दादा..!

महाराष्ट्रात याना त्या कारणाने नेहमीच चर्चेत असलेल्या काही मोजक्याच नेत्यांपैकी एक म्हणजे अजित पवार. त्यांच्यावर प्रसिद्धी माध्यमातून व विरोधकांकडून नेहमीच कडाडून टीका होते. अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड शहरात भरपूर विकास कामे करून शहराचा कायापालट केला.हे आपण जानतोच.खर तर सर्वांचे दादा म्हटलं तरी वावगं ठरू नये असं व्यक्तिमत्त्व म्हणजे अजित पवार .जिथं काम होणार तिथं दादा दादाच असतात आणि एरव्ही मात्र भावाप्रमाणे कार्यकर्त्यांना आपलसं करतात. महाराष्ट्राच्या राजकारणात असे स्पष्ट ,परखड , प्रभावी नेतृत्व लाभले ते त्यांच्यावरील संस्काराला श्रेय जाते.यशवंतराव चव्हाण यांच्या संस्काराची शिदोरी त्यांना मिळाली आणि राजकारण असो की समाजकारण यात स्वतः ला झोकून देऊन 'जीत' झाल्याशिवाय अजित पवार गप्प बसतील ते कसलं नेतृत्व. आता नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या पराभवावरून इतक्यात यशाचा आलेख मापण म्हणजे थोडं चुकीचंच होईल.मुद्दा असा की, त्यांच्याकडील गेलेला एक खासदार निवडून आला म्हणजे त्यांचा ती जीत आहे. राहिला मुद्दा लोकसभा निवडणुकीत चार जागांचा त्यात एक निवडून आली. त्यामुळे त्यावर विशेष काही सांगण्याची गरज नाही. अजीत पवार सत्तेत असो, की विरोधात काम करण्याची त्यांची हातोटी वाखाणण्याजोगी. एकदा का काम हाती घेतलं की, त्याचा फडशा पडल्याशिवाय चैन पडत नाही. सतत सत्तेत राहून महाराष्ट्राच्या विकासासाठी काय करता येईल यासाठी धडपडणार व्यक्तीमत्व म्हणजे सर्वांचे दादा.विरोधक, सत्ताधारी,जनता माध्यमं ही सगळी मंडळी दादा म्हणून हाक देतात.असा नेता निराळाच.२ जुलै २०२३ पासून ते महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रीमंडळात देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत उपमुख्यमंत्री झाले आणि विकासाचा त्रिकोण पूर्ण झाला. तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदारांना फोडून ते सत्तेत आले आणि महाराष्ट्रात विकास कामाच्या उद्घाटनाची सुरुवात झाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २०२२–२३ या काळात त्यांनी महाराष्ट्र विधानसभेत विरोधी पक्षनेते म्हणून काम केले. तसेच बारामती लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून काम केले आहे.ते १९९१ पासून बारामती विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे ते पुतणे म्हणून. ते सर्वश्रुत आहे.सर्वाधिक वेळा राज्याचे उपमुख्यमंत्री राहिले असून, सध्या ते पाचव्यांदा या पदावर आहेत.



२०१९ मध्ये, त्यांनी भारतीय जनता पक्षाचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांनी दावा केला की त्यांना राष्ट्रवादीच्या बहुसंख्य आमदारांचा पाठिंबा आहे. परंतु ३ दिवसात दोघांनी राजीनामा दिला. २०२३ मध्ये त्यांनी त्यांचे काका शरद पवार यांना सोडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, यामुळे राष्ट्रवादीमध्ये अभूतपूर्व फूट पडली. तसेच अजित पवार यांनी राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदावर देखील हक्क सांगितला. पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह स्वतःकडे ठेवण्याची इच्छा व्यक्त केली आणि विद्यमान अध्यक्ष शरद पवार यांच्यापासून राष्ट्रवादी पक्ष स्वतःकडे घेतला .अजित पवार यांनी १९८२ साली राजकारणात प्रवेश केला. त्याचवर्षी सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर त्यांची निवड झाली.पुणे जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी १९९१ साली त्यांची निवड झाली. अनेक सहकारी संस्थांमध्ये त्यांनी प्रतिनिधित्व केले आहे.आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महायुतीचा घटक पक्ष असला तरी पक्षाची फुले–शाहू –आंबेडकरी विचारधारा कायम जपलेली दिसते. त्यांनी भूषवलेली पदे हे त्यांचा अनुभव सांगतात मग ते सहकारी क्षेत्र असो की राजकीय.१९९१ साली पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष ,१९९८ महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष,२००५ साली महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष,२००६ ला महाराष्ट्र राज्य खो–खो असोसिएशनचे अध्यक्ष,२०१३ साली महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष,२००६ ला पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष,जून, इ.स. १९९१ ते सप्टेंबर, इ.स. १९९१ दरम्यान लोकसभा सदस्य,१९९१ ला विधानसभा सदस्य झाले ते आजतागायत.१९९१ पासून सलग सहा वेळा विधानसभा सदस्य म्हणून निवड.१९९५ ते इ.स. १९९९, इ.स. १९९९ ते इ.स. २००४, इ.स. २००४ ते इ.स. २००९, इ.स. २००९ ते २०१४ , इ.स २०१४.ते २०१९ , इ.स २०१९ ते २०२४ पर्यंत.१९९१ साली कृषी, फलोत्पादन आणि उर्जा राज्यमंत्री ,१९९२ ला जलसंधारण, ऊर्जा व नियोजन, मंत्री – पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे ही महामंडळे), फलोत्पादन – ऑक्टोबर इ.स. १९९९ ते जुलै इ.स.२००४.मंत्री – ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे ही महामंडळे) – इ.स. जुलै २००४ ते नोव्हेंबर २००४.मंत्री – जलसंपदा (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे ही महामंडळे वगळून), लाभक्षेत्र विकास, पाणीपुरवठा व स्वच्छता – नोव्हेंबर, इ.स. २००४ ते नोव्हेंबर, इ.स. २००९.मंत्री – जलसंपदा (कृष्णा खोरे व कोंकण पाटबंधारे ही महामंडळे वगळून), ऊर्जा – नोव्हेंबर, इ.स. २००९ ते नोव्हेंबर, इ.स. २०१०.उप मुख्यमंत्री,(वित्त व नियोजन, ऊर्जा) – नोव्हेंबर, इ.स. २०१० ते सप्टेंबर इ.स.२०१२. उप मुख्यमंत्री(वित्त व नियोजन, ऊर्जा) – डिसेंबर इ.स. २०१२ ते इ.स. सप्टेंबर २०१४.उप मुख्यमंत्री, इ.स. २०१९ ते इ.स. २०१९ उप मुख्यमंत्री झाले. आज महायुती सरकारमध्ये उप मुख्यमंत्री म्हणून काम करीत आहेत.१९९१ साली पहिल्यांदा अजित पवार बारामती मधून लोकसभेवर निवडून गेले. नंतर काका शरद पवार यांच्यासाठी त्यांनी खासदारकीचा राजीनामा दिला. त्यानंतर शरद पवार पी. व्ही. नरसिंहराव सरकारमध्ये संरक्षणमंत्री झाले.हे विशेष. मंत्री पदाचा, सहकारी क्षेत्राचा, विधिमंडळाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या महाराष्ट्राच्या मनातील दादा म्हणजे अजीत पवार यांचा आज वाढदिवस. त्यानिमित्ताने त्यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



**पदमाकर उखळीकर,**
मो.९९७५१८८९१२

**शिक्षकांच्या जागा भरण्याचे ...**

शरद गोसावी यांच्याशी तातडीने संपर्क साधून मंजी मंत्री क्षीरसागर यांनी बीड जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आदेश देण्याची विनंती केली. त्यानुसार शिक्षण संचालक यांनी जिल्हा परिषद अंतर्गत पदभरतीपुर्वी कार्यरत असलेल्या शिक्षकांमधुन विज्ञान व गणित विषयाचे विषय शिक्षक पदोन्नती प्रक्रिया राबवण्याचे आदेश दिले आहेत.कार्यरत असलेल्या शिक्षकांपैकी रिक्त पदांच्या मर्यादेत सेवाजेष्ठता शिक्षकांमधुन गुणवत्तेनुसार इयत्ता ६ वी,७ वी,८ वी करीता विषय शिक्षकांच्या पदोन्नतीची प्रक्रिया राबवण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

**मनसेही विधानसभा निवडणूक...**

महाजन यांनी माध्यमांना आज सांगितलं. ते आज एबीपी माझाशी बोलत होते.राज ठाकरे यांनी आमच्या पक्षमेळाव्यात जाहीर केलं होतं की आम्ही २००–२१५ जागा लढवणार आहोत. राज ठाकरेंनी असा निर्णय घेतला असेल तर आम्ही कार्यकर्ते तयार

## पान एक वरून

आहोत, असं प्रकाश महाजन म्हणाले. मतदारसंघातील आढाव्यासाठी राज ठाकरेंनी प्रत्येक जिल्ह्यात निरिक्षक नेमले होते. त्यांचा अहवाल आल्यानंतरच राज ठाकरेंनी हा निर्णय घेतल्याचं प्रकाश महाजन म्हणाले. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीसाठी राज ठाकरेंनी प्रचंड प्रयत्न केले. ते भाजपाबरोबर युती करून काही जागा लढवतील अशी अटकळ बांधली गेली. परंतु, ही अटकळ खोटी ठरली. कारण, त्यांनी लोकसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला. परंतु, त्यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दर्शवला होता. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत ते महायुतीतून लढणार की स्वबळाने निवडणूक लढवणार हे अद्याप गुलदस्त्यात आहे. परंतु, त्यांनी २००–२१५ जागा लढवण्याचा निर्णय घेतला असेल तर त्यांना स्वबळावरच निवडणूक लढवावी लागेल, हे स्पष्ट आहे असं राजकीय वर्तुळात बोललं जात आहे.

**केज पोलिसांची राहतेय...**

त्याबाबत माहिती द्यावी जेणे करून समाजात अशांतता ठेवणारे यांचे वर कारवाई करण्यासाठी सोयीस्कर होईल व सामाजिक सुव्यवस्था अबाधित राहील यासाठी आपली मदत ही अमूल्य राहील याची जाणीव ठेवावी. आपला बीड जिल्हा हे आपले कुटुंब आहे,आमच्या पोलीस कुटुंबाचे आपण सदस्य आहात आपल्या बीड जिल्ह्या मध्ये शांतता राहावीआणि आपल्या मोहल्या मध्ये आपआपसांमध्ये तान तणाव होऊ नये जेणे करून सर्व नुकसानआणि हानी ही आपल्यालाच होणार आहे,याची जाणीव ठेवून प्रत्येक नागरिकांनी आपली जबाबदारी सामंजस्याने सांभाळावी हीच एक विनंती आहे.सर्व नागरिक हे जागृत आहेत सुशिक्षित आहेत आणि सज्ञान आहेत अशीअपेक्षा ठेवतो कोणतीही अफवा किंवा कोणी अशांतता निर्माण केल्यास नक्कीच मला माहिती भेटेल अशी अपेक्षा ठेवतो आणि त्याच्याविरुद्ध आपण माहिती दिली तर ते कोणी असो त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल परंतु आपण कोणतेही आततार्इ कृत्य करून कायदा हातात घेऊ नये व पोलिसांना मदत करावी जेणेकरून कोणतीही अनुचित घटना घडणार नाही.असे आपणास पोलिस स्टेशन केजच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.असे आवाहन पोलिस निरीक्षक प्रशांत कमलाकर महाजन पोलीस स्टेशन केज शहर जि.बीड यांनी केले आहे.

**प्रकाश आंबेडकरांची...**

माहिती समोर आली आहे. या बैठकीला शरद पवारही उपस्थित राहण्याची शक्यता आहे.यादरम्यान प्रकाश आंबेडकर यांनी राज्यात काढणाऱ्या ओबीसी यात्रेचं छगन भुजबळ यांना निमंत्रण दिलं आहे. त्यामुळे मनोज जरांगे एकटे पडणार की काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. आता जरांगे हे काय भूमिका घेणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

**केज तालुक्यात बेसुमार....**

चालू आहे असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. पींपरी मंडळातील मंडळ अधिकारी व पोलिस बीट अंमलदार यांना वाळू उपसा करण्यासाठी वाळुमाफीयांन कडुन कीती हप्ता घेऊन गप्प बसले आहे असा प्रश्न नागरिकांना पडला कारण कारवाई करण्यात मंडळ अधिकारी गुपचुप दीसत आहेत तर बीट अंमलदार पोलिस चुपचाप दीसत आहेत.

**मराठा आरक्षणासह...**

श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्राचे काम करु असे लेखी आश्वासना नंतर उपोषणाला स्थगिती देण्यात आली परंतू उपोषणाला स्थगिती देऊन ऐक महीना उलटुन सुध्दा काम सुरू केले नसल्याने परत २४/०७/२०२४ रोजी अमरण उपोषन सुरू करण्यात येणार आहे जो पर्यंत कामाला प्रेत्येशात कामाला सुरुवात केली जात नाही तोपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहणार आहे असे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

**रासप मतदार संघाच्या...**

यामध्ये आष्टी मतदार संघाचा समावेश आहे. यासर्व विधानसभा मतदार संघात रासप बहुजन समाजाला घेऊन ताकदीनिशी निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे डॉ. शिवाजी शेंडगे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगीतले. आष्टी, पाटोदाव शिरुर मतदार संघाच्या पक्ष निरिक्षकपदी नियुक्ति झाल्याबद्दल शेंडगे यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

**रायमोहा ग्रामपंचायतचे**

माजी जि प सदस्य सुभाष क्षिरसागर,उपसरपंच सुरेश जाधव, सखाराम जाधव, परमेश्वर मंडलीक,वैजिनाथ जायभाये परिश्रम घेत आहेत.परिणामी गावातील कोणत्याही रोडवर सांडपाणी येऊन घाण होणार नाही. घनकचरा व्यवस्थापन करताना ग्रामपंचायत रायमोह प्रशासनाने येवलवाडी रोडवर हौद केला आहे.या

## पान सहा वरून

हौदाच कचऱ्यापासून खतनिर्मिती होणार आहे असे उपसरपंच सुरेश जाधव यांनी सांगितले.तर रायमोह येथे बैल बाजार भरवुन पशुपालक यांची सोय केली आहे.यामुळे ग्रामपंचायत च्या उत्पन्नात भर पडली आहे. तर रायमोहा येथिल सर्व धर्मियांच्या प्रार्थना स्थळासमोर व मंदिरा समोर प्लेवर ब्लॉक बसवण्यात आले आहेत. रायमोहा ग्रामपंचायत अंतर्गत वयक्तीक लाभाच्या योजना व बेघरांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात आला आहे. रायमोह परिसरातील कामगार मजुरांना तीस संसाराच्या भांड्याच्या वस्तु च्या किटचे वाटप करण्यात आले.मजुरांना संसार उपयोगी वस्तू खरेदी करुन त्यांना देणारी रायमोहा ग्रामपंचायतचा स्त्युत्य कार्यक्रम हाती घेतला.

**धारेश्वरच्या धबधब्यात तोल**

सुनिल जाधव, श्रींरग जंजाळ, बंडू पाटील, सोन्या गवळी आदींनी रेस्कु मोहीम हाती घेतली अखेर सकाळी अकरा वाजता रामदास जाधव यांना धबधब्याच्या खोल कपारीत मृत गौरव नेरकर चा मृतदेह आढळून आला बनोटी प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉ कादरी सपुरा यांनी मृतवर शवविच्छेदन केले व मृतदेह नातेवाईक च्या ताब्यात दिला. धारेश्वर धबधब्यात दर वर्षी तीन ते चार जणांचा धबधब्यात बुडून मृत्यू होतो तालुका प्रशासनाने अद्यापही या धोकादायक पर्यटन स्थळावर सुरक्षितता च्या दृष्टीने कोणत्याही उपाय योजना केलेल्या नाही या ठिकाणी संरक्षण भिंत उभारणे गरजेचे आहे असे स्थानिकांचे मत आहे या प्रकरणी पोलीस निरीक्षक पंकज बारवाल उपनिरीक्षक रज्ज़क शेख विकास दुबिले संदीप सुसर राजू बर्डे आदी पुढील तपास करत आहे.

**आरक्षण बचाव मेळाव्यास**

माजलगाव मतदार संघातील ओबीसी समाजाने हजारोंच्या संख्येत उपस्थित राहण्याचे आवाहन बैठकीचे संयोजक माजलगाव मतदार संघाचे ओबीसी नेते माधवराव निर्मळ यांनी केले. याप्रसंगी मतदारसंघातील शेकडो ओबीसी सरपंच, उपसरपंच सह कार्यकर्ते जमा झाले होते.

**गुरुमुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रांती**

संचालिका छाया देशमुख, प्राचार्या डॉ विद्या देशपांडे, प्रा डॉ अरुण चव्हाण यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मान्यवरांसह महाविद्यालयातील सर्व शिक्षकांचे गुलाब पुष्प देवून स्वागत केले. यावेळी गौरी पुजारी,वैष्णवी काबरा, आकांक्षा मुरकुटे,नंदिनी सातपुते, साक्षी आढाव या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. पुढे बोलताना प्रा डॉ चव्हाण म्हणाले की, प्रत्येकांच्या जीवनात गुरुंचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनातील सर्व गुरुंचा आदर केला पाहिजे. प्राचार्या डॉ विद्या देशपांडे यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संध्या सातपुते, प्रास्ताविक नेतल शर्मा तर आभार अश्विनी देशमुखने मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**परळीमध्ये कॉंग्रेसची पत्रकार**

राहिले आहे. या पत्रकार परिषदेचे निमंत्रण परळीतील सर्व पत्रकार बांधवांना देण्यात आले आहे.मंगळवार दि.२३ जुलै...दुपारी १.०० वाजता इमदादुल उलुम माध्यमिक शाळा पावर हाउसच्या पाठिमागे येथे होणार आहे. तरी या महत्व पूर्ण पत्रकार परिषदेला सर्व पत्रकार बांधवांनी उपस्थित राहावे असे परळी शहराचे काँग्रेसचे अध्यक्ष तथा निमंत्रण सय्यद हनिफ उर्फ बहादुरभाई यांनी सांगितले आहे.

**अन्याच्या विरोधात**

घोषित करावा ६० वर्षापासून करचुंडी येथील बौद्ध बांधव गायरान जमीन नावावर करण्यासाठी लढत आहेत तात्काळ त्यांना न्याय द्यावा फिलोसिफ,स्वाधार घरकुल योजनेचा सामाजिक न्यायचा निधी इतरत्र वळू नये ती सरसकट द्यावी आजच्या तारखेपर्यंत ताब्यात असलेल्या गायरान जमिनीचे सातबारे देण्यात यावेत. अशा आशयाचे निवेदन माजलगाव तहसीलदार यांच्यामार्फत गृहमंत्री सामाजिक न्याय मंत्री यांना देण्यात आले. या धडक मोर्चा ला ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाई केदार, विनोद भोळे, अशोक घडवे पाटील,जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे,भीमराव कदम, प्रल्हाद डावरे, मच्छिंद्र पायके, वसीम शेख, मीणाताई लोंढे,अविनाश वाघमारे, सूर्यकांत ठोकळ, विनोद कोरडे, बादल तरकसे, त्रिंबक पायके,व संघटनेतील कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

**भारतीय हितकारणी....**

यांनी केले, प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ.संजय पगारे (स्त्रीरोगतज्ञ), बाळासाहेब मिसाळ पाटील( प्रदेश उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार), शैलेंद्र मिसाळ( राष्ट्रीय अध्यक्ष, भारतीय क्रांती दल), एडवोकेट पवनकुमार शिंदे, एडवोकेट रावसाहेब मोहन, कोळेकर इत्यादी प्रमुख पाहुणे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संचित धनवे, स्वप्निल घुमरे, कबीर घुमरे, राहुल मकासरे बालाजी अभंगे, यांनी मेहनत घेतली. विनोद वाघालळकर यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. ईश्वर वाघमारे यांनी आलेल्या पाहुण्यांचे व कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त केले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अ‍ॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई-मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

**सुविचार :** संकटं तुमच्यातली शक्ती, जिद्द पाहण्यासाठीच येत असतात.

## मोठा भाऊ भाजपच....!

लोकसभा निवडणुकीतील धक्कादायक अपयशानंतर महाराष्ट्रातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये पुन्हा जोम निर्माण करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी महाराष्ट्रातील पुढचे सरकार महायुतीचेच असेल आणि त्या सरकारचे नेतृत्व भाजपच करेल असे सांगत महायुतीचे सरकार आल्यास भाजपचाच मुख्यमंत्री असेल याचे स्पष्ट संकेत दिले आहे. येती विधानसभा निवडणूक महायुती विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याच नेतृत्वाखाली लढेल असे भाजप नेते वारंवार सांगत असले तरी निवडणुकीनंतर मुख्यमंत्री कोणत्या पक्षाचा असेल यावर या नेत्यांनी कायमच मौन बाळगले आहे, परंतु अमित शहांनी मात्र पुढील महायुतीचे सरकार भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वात असेल हे स्पष्ट केले आहे. याचा अर्थ मुख्यमंत्रीपद भाजपकडेच असेल असाच होतो. अर्थात नेतृत्व भाजपकडे राहिले तरी मुख्यमंत्री नेमके कोण असतील हे सांगायचे मात्र त्यांनी टाळले. यापूर्वीच्या निवडणुकीत देवेंद्र फडणविसच पुढचे मुख्यमंत्री असतील असे भाजपचे वरिष्ठ नेते ठामपणे सांगत होते, यावेळी मात्र भाजप नेतृत्वाने मुख्यमंत्री पदाच्या संदर्भात आपले पत्ते राखून ठेवल्याचे दिसते. सत्ता स्थापन करण्याची संधी मिळाली तर साधारण ज्या पक्षाचे आमदार अधिक त्या पक्षाला मुख्यमंत्रीपदाची संधी मिळत असते, परंतु मागच्या वेळी शिवसेनेत फूट पडल्यानंतर एकत्र सत्ता स्थापन करताना भाजपने आपल्यापेक्षा निम्मे आमदार पाठीशी असलेल्या एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री पदाची संधी दिली. तो एक रणनीतीचा भाग होता. एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्रीपद देण्यामागे कदाचित उद्धव ठाकरे गटाचे पुरते खच्चीकरण करण्याची योजना होती, परंतु त्यात फारसे यश आल्याचे दिसत नाही. त्याचवेळी अजित पवारांना सोबत घेऊनही शरद पवार गटाची ताकद कमी झाल्याचे दिसत नाही. या फसलेल्या प्रयोगामुळेच आता पुढच्या वेळी सरकारचे नेतृत्व आपल्याकडेच ठेवायचे, असे भाजप श्रेष्ठींनी ठरविल्याचे दिसते. भाजपच्या या निर्णयामुळे शिंदे आणि अजित पवार गटात नाराजी निर्माण होण्याची शक्यता असली तरी या दोन्ही गटांना सध्याच्या परिस्थितीत भाजपची साथ सोडणे परवडणारे नाही. नेत्यांची ही मजबूरी असू शकते, परंतु या दोन्ही नेत्यांसोबत असलेल्या आमदारांपैकी काहींची भूमिका वेगळी राहू शकते. आमदार म्हणून पुन्हा निवडून येण्याची प्रत्येकाचीच धडपड असते, त्यामुळे आपल्या मतदारसंघात सोईचे गणित कोणते असू शकते याचा विचार करून हे आमदार आपली पुढची भूमिका ठरविण्याची शक्यता आहे. तशी चिंता भाजपला नाही. भाजपच्या बहुतेक विद्यमान आमदारांनी काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांचा मागच्या निवडणुकीत पराभव केला होता. शिवसेनेसोबत भाजपची युतीच होती. अडचण होणार आहे ती शिंदे आणि अजित पवार गटाच्या आमदारांची. त्यांची लढत प्रामुख्याने उद्धव ठाकरे आणि शरद पवार गटाच्या उमेदवारासोबत होणार आहे. या लढतीत सहानुभूती किंवा पक्षासोबत बेईमानी हा घटक कितपत प्रभावी ठरतो, याची सगळ्यांना काळजी आहे, शिवाय सरकार विरोधी लाटेचाही त्यांना सामना करावा लागेलच. मराठा आरक्षणाचा मुद्दादेखील निवडणुकीपर्यंत तापता ठेवल्या जाईल. तात्पर्य सर्वाधिक प्रतिकूल परिस्थिती शिंदे-अजित पवार गटाच्या आमदारांसाठी असेल. त्यातच मुख्यमंत्रीपद आपल्या गटाला मिळणार नाही, याची खात्री पटल्याने या सगळ्या विद्यमान आमदारांमध्ये अस्वस्थता नक्कीच असेल. रणनीतीचा भाग म्हणून उद्धव ठाकरे किंवा शरद पवार गटाकडे जाऊ पाहणाऱ्या आमदारांना अगदी ऐन निवडणुकीच्या तोंडावर या नेत्यांनी पक्षात प्रवेश आणि उमेदवारी दिली तर ऐनवेळी नवे सक्षम उमेदवार देण्यासाठी एकनाथ शिंदे आणि अजित पवारांना बरीच धावपळ करावी लागेल. शिंदे आणि अजित पवार गटाला आपली आधीची ताकद टिकवून ठेवण्यात यश मिळाले तर महायुतीचे सरकार सत्तेत पुन्हा येईल याबाबत शंका नाही, परंतु भाजपने आधीच मुख्यमंत्री आपलाच असेल ही घोषणा केल्याने पुन्हा एकदा मागच्या सारखी परिस्थिती निर्माण होऊ शकते. मुख्यमंत्रीपद किंवा अन्य महत्त्वाच्या मंत्रिपदाच्या वाटणीवरून महायुतीत फूट पडणारच नाही, याची खात्री देता येत नाही. ही संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊनच भाजप नेतृत्वाने आक्रमक भूमिका घेत दोन्ही पैकी कोणत्याही एका गटाने जरी वेगळा विचार केला तरी बहुमतावर फरक पडणार नाही या दृष्टीने आपली तयारी ठेवण्याचा प्रयत्न सुरू केल्याचे दिसते. जागावाटपातही त्याचे पडसाद उमटू शकतात. शिंदे-पवार गटाला सव्वाशेपेक्षा अधिक जागा सोडण्यास भाजप तयार होईल असे दिसत नाही. एकूण काय तर पुन्हा एकदा राज्यात भाजपच मुख्य सूत्रधार असेल यासाठी भाजपची यंत्रणा सज्ज झाल्याचे दिसते. अमित शहांच्या भाषणातून याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत.

## बांगलादेशात आरक्षणाचा भडका....!

सरकारी नोकरीतील आरक्षण हा विषय बेरोजगारीच्या समस्येने ग्रस्त असलेल्या अनेक देशांमध्ये अतिशय संवेदनशील झाला आहे. जगण्याला आर्थिक स्थिरता देण्याचा एक खात्रीशीर पर्याय म्हणून सरकारी नोकरीकडे पाहिले जाते आणि म्हणूनच ही नोकरी प्राप्त करण्यात येणाऱ्या अडथळ्यांच्या विरोधात बरोजगार तरूणांमध्ये प्रचंड चीड दिसून येते. शेजारच्या बांगलादेशात गेल्या काही दिवसांपासून प्रचंड हिंसक आंदोलन भडकले आहे. सरकारी नोकऱ्यांमध्ये असलेल्या आरक्षणाच्या विरोधात विद्यार्थी रस्त्यावर उतरले, त्यांची समजूत काढण्याऐवजी त्यांना देशद्रोही ठरविण्यापर्यंत विद्यमान सरकारची मजल गेली आणि त्यातून आंदोलन अधिकच हिंसक बनत गेले. या आंदोलनात प्रचंड जाळपोळ झाली, जवळपास दीडशेपेक्षा अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला. सरकारने आंदोलन दडपण्यासाठी दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे आदेश दिले, परंतु त्यानंतरही आंदोलनाची धग कमी झाल्याचे दिसले नाही. शेवटी बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयाने आंदोलक विद्यार्थ्यांच्या मागणीची दखल घेत सरकारी नोकरीत १९७१च्या स्वातंत्र्यलढ्यात लढलेल्यांच्या वंशजासाठी असलेले ३० टक्के आरक्षण कमी करून ते पाच टक्क्यांवर आणण्याचा निर्णय दिला. स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतलेल्यांच्या वंशजांना सरकारी नोकरीमध्ये ३० टक्के आरक्षण दिले गेले तर आपण सरकारी नोकरीच्या लाभापासून वंचित राहू, अशी भीती आंदोलक विद्यार्थ्यांना वाटत होती. त्यातूनच या आंदोलनाने आकार घेतला. सुरूवातीला विद्यापीठातून सुरू झालेल्या या आंदोलनाने बघता बघता देशव्यापी स्वरूप धारण केले आणि त्याला हिंसक वळण मिळाले. शेख हसीना सरकारने आंदोलकांची समजूत काढण्याऐवजी त्यांना न जुमानण्याचेच धोरण अवलंबिले. त्यामुळे दिवसेंदिवस हे आंदोलन अधिक पेटत गेले. सरतेशेवटी, संपूर्ण बांगलादेशभर कर्फ्यू लागू करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचा रोष शांत करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय रद्दबातल ठरवित स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्यांच्या वंशजांसाठी देण्यात आलेलेल ३० टक्के आरक्षण कमी करुन ते ५ टक्क्यांवर आणले, या निर्णयानुसार, देशातील ९३ टक्के पदे गुणवत्तेनुसार भरली जातील. उर्वरित २ टक्के पदे वांशिक अल्पसंख्याक, पारलिंगी व्यक्ती आणि अपंग लोकांसाठी राखीव असतील. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा निर्णय महत्त्वाचा असला तरीही स्वातंत्र्यलढ्यातील सहभागींच्या वंशजांसाठी लागू केलेले सर्वच्या सर्व आरक्षण पूर्णपणे रद्द करण्याची आंदोलकांची मागणी आहे.

### शिवार

# कपाशीच्या उत्पन्नात गळफांदी व फळफांदीचे व्यवस्थापन



**अनिल भोकरे**
9422367262
सेवानिवृत्त प्रकल्प संचालक, आत्मा तथा संचालक- ॲग्रेरियन

गळफांदी आणि फळफांदी यांच्यातील फरक समजून घेऊन योग्य पद्धतीने गळफांदी काढल्यास कापसाच्या उत्पादनात वाढ आणि गुणवत्तेत सुधारणा होऊ शकते. गळफांदी काढल्यामुळे झाडाच्या मुख्य फांद्यांना अधिक पोषक तत्त्वे मिळतात आणि झाडाच्या ऊर्जेची बचत होते. परिणामी, कापसाच्या उत्पादनात लक्षणीय वाढ होते आणि शेतकऱ्यांना आर्थिक लाभ होतो.



'काळ्या मातीतील पांढरे सोने', अशी ख्याती असलेल्या कपाशीचे उत्पन्न भारतात मोठ्या प्रमाणात घेतले जाते. भारतात जवळजवळ ११७.६ लाख हेक्टर क्षेत्रांत कापसाची विक्रमी लागवड केली जात असली, तरी उत्पादकतेच्या बाबतीत भारतातील कापसाचे उत्पादन मात्र तुलनेने कमी आहे. त्याची अनेक कारणे आहेत. त्या कारणांचा शोध घेत पुढील लेखांमध्ये आपण कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पादन कसे वाढविता येईल? याबाबत नक्कीच चर्चा करू या.

पूर्व हंगामी कपाशी लागवड करणाऱ्या शेतकरी बांधवांसाठी काळजी घेण्याच्या दृष्टीने आता पुढील काळ अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यातीलच एक भाग म्हणजे गळफांदी व फळफांदीचे व्यवस्थापन होय. कारण कापूस उत्पादनात गळफांदी आणि फळफांदी यांची भूमिका खूप महत्त्वाची आहे. या दोन प्रक्रियांच्या विश्लेषणातून आपल्याला कापसाच्या उत्पादनात वाढ आणि गुणवत्तेत सुधारणा करता येते. गळफांदी आणि फळफांदी यांच्यातील फरक, त्यांची ओळख, त्यांचे फायदे-तोटे, आणि गळफांदी काढण्याची प्रक्रिया यांचा सविस्तर अभ्यास केल्यास उत्पादनाच्या गुणवत्तेत आणि प्रमाणात निश्चितपणे चांगला परिणाम दिसून येतो.

सर्वात आधी गळफांदी आणि फळफांदी कोणती? त्यांच्यातील मुख्य फरक ओळखणे महत्त्वाचे आहे. गळफांदी म्हणजे झाडाच्या मुख्य खोडावरून निघणाऱ्या अवांछित आणि दुबळ्या फांद्या असतात. या फांद्या सहसा कमी वाढलेल्या आणि पानांच्या घनतेमुळे प्रकाश पोहोचत नाहीत. या फांद्या काढल्यामुळे झाडाच्या मुख्य फांद्यांना अधिक पोषक तत्त्वे मिळतात आणि उत्पादनात वाढ होते. दुसरीकडे, फळफांदी म्हणजे झाडाच्या मुख्य खोडावरून निघणाऱ्या सशक्त आणि पोषणमूल्य असलेल्या फांद्या असतात. या फांद्यांवर फुले आणि फळे लागतात, ज्यामुळे मुख्य उत्पादन मिळते.

गळफांदी ओळखण्यासाठी काही महत्त्वाचे गुणधर्म आहेत. गळफांदी सहसा मुख्य खोडाच्या जवळपास असतात आणि अनियमित दिशांमध्ये वाढतात. गळफांदीवर पानांची संख्या कमी असते आणि पानांचे आकार छोटे असतात. या फांद्या सहसा कमी वाढलेल्या असतात आणि फुले किंवा फळे लागत नाहीत. त्याउलट, फळफांदी मुख्य खोडावरून ठराविक दिशांमध्ये सशक्तपणे वाढतात. फळफांदीवर पानांची संख्या अधिक असते आणि पानांचे आकार मोठे असतात. या फांद्यांवर फुले आणि फळे लागतात, ज्यामुळे उत्पादनात वाढ होते.

गळफांदी काढण्याची प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी, झाडाची उंची सुमारे ३० ते ४५ सें.मी. झाल्यावर ही प्रक्रिया करावी. साधारणतः लागवडीच्या ६० ते ७० दिवसांनंतर गळफांदी काढावी. गळफांदी काढण्यासाठी तीक्ष्ण कात्री किंवा बागायतीची साधने वापरावीत. मुख्य फांद्यांशिवाय अन्य सर्व गळफांद्या काढाव्यात. फांद्या काढताना झाडाच्या खोडाच्या जवळून फांदी कापावी. कोणत्याही रोगग्रस्त किंवा कमजोर फांद्या देखील काढाव्यात. मुख्य फांद्या सशक्त ठेवण्यासाठी अवांछित फांद्या नियमितपणे काढाव्यात. फांद्या कापताना झाडाच्या खोडाला हानी पोहोचू नये याची काळजी घ्यावी. गळफांदी काढण्यासाठी वापरणारी साधने स्वच्छ आणि निर्जंतुक असावीत, ज्यामुळे रोगांचा प्रसार होणार नाही.

गळफांदी काढण्याचे अनेक फायदे आहेत. गळफांदी काढल्यामुळे झाडाच्या पोषणातील संतुलन राखले जाते, ज्यामुळे उत्पादनात वाढ होते. गळफांदीमुळे हवा खेळती राहते, ज्यामुळे बुरशीजन्य आणि इतर रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो. गळफांदीमुळे फुलांची संख्या आणि गुणवत्ता सुधारते. मुख्य फांद्यांना अधिक पोषक तत्त्वे मिळतात, ज्यामुळे फांद्यांचा विकास चांगला होतो. तथापि, गळफांदी काढण्याचे काही तोटेदेखील आहेत. गळफांदी काढण्यासाठी कामगारांची आवश्यकता असते, ज्यामुळे उत्पादन खर्चात वाढ होते. जर गळफांदी योग्य पद्धतीने केली नाही, तर झाडाच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. गळफांदी काढण्याच्या प्रक्रियेत वेळ आणि मेहनत अधिक लागते.

गळफांदी आणि फळफांदी यांच्यातील फरक समजून घेऊन योग्य पद्धतीने गळफांदी काढल्यास कापसाच्या उत्पादनात वाढ आणि गुणवत्तेत सुधारणा होऊ शकते. गळफांदी काढल्यामुळे झाडाच्या मुख्य फांद्यांना अधिक पोषक तत्त्वे मिळतात आणि झाडाच्या ऊर्जेची बचत होते. परिणामी, कापसाच्या उत्पादनात लक्षणीय वाढ होते आणि शेतकऱ्यांना आर्थिक लाभ होतो. त्यामुळे, गळफांदी काढणे हा कापूस पिकाच्या व्यवस्थापनातील एक महत्त्वपूर्ण घटक आहे, ज्यामुळे उत्पादनात सुधारणा साधता येते.

### थर्ड अम्पायर

# महाराष्ट्रात पार पडले दोन 'श्रीमंतां'चे सोहळे!



**जयंत महाजन**
9420691420

एका बाजूला अंबानींच्या 'श्रीमंती'ची चर्चा, तर दुसऱ्या बाजूला पंढरपूरच्या वारीतील 'श्रीमंती'ची चर्चा. आता जनतेने सांगावे खरी 'श्रीमंती' कोणत्या ठिकाणी होती?





भारतातील श्रीमंत उद्योगपती मुकेश अंबानी आणि नीता अंबानी यांचा धाकटा मुलगा 'अनंत' आणि एन्कोर हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेडचे सीईओ वीरेन मर्चट यांची मुलगी 'राधिका' यांचा शाही विवाह नुकताच संपन्न झाला. हा विवाह सोहळा जणू आपल्या घरातीलच विवाह सोहळा असल्यासारखे 'श्रीमंतां'च्या घरातील वातावरण होते, तर दुसऱ्या बाजूला पंढरपूरला पांडुरंगाच्या भेटीसाठी आतुर झालेला 'श्रीमंत' वारकरी. कोणत्याही वृत्तवाहिनीचे चॅनल बदलून पाहिले, तरी अंबानींच्या घरातील विवाह व पंढरपूरच्या वारीतील दृष्ये सोडून दुसरा विषय दिसायलाच तयार नव्हता. असो, शेवटी बहुचर्चित अंबानींच्या मुलाचं लग्न अत्यंत थाटात पार पडलं. दुसऱ्या बाजूला ग्रामीण भागातील 'घोडमुंजे' मात्र अद्यापही मोकाटच दिसत आहेत. अनेकांच्या घरीदारी लग्न असले, तरी महाराष्ट्र राज्यातच नाही तर देशात व परदेशात चर्चा जर कोणाच्या लग्नाची झाली असेल, तर ती उद्योगपती अंबानी यांच्याच मुलाच्या लग्नाची. ज्या देशात करोडो लोक रेशनिंगवर अवलंबून आहेत, त्या देशातील पाच हजार कोटी रुपयांचा चुराडा करणारे लग्न अनेकांची धुंदी उतरविणारे ठरू शकेल. देशात दर तासाला एक शेतकरी आत्महत्या करतोय, तसेच ग्रामीण भागातील दरडोई उत्पन्न हे खालच्या पातळीवर गेले असले, तरी लोकांनी अंबानींच्या मुलाच्या लग्नाचीच जास्त चर्चा केली. अंबानींनी काय काय 'आयडिया' करून या लग्नाचा खर्च काढला, हे जनतेला समजेपर्यंत त्यांचा खिसा केव्हाच रिकामा होऊन गेला होता. अंबानींच्या मुलाच्या लग्नात वऱ्हाडी कोण कोण होते? याकडे लक्ष दिल्यानंतर आपण कुठे आहोत हे लक्षात येते. या विवाह सोहळ्याचे गेल्या कित्येक महिन्यांपासून गुणगान सुरू होते. अनेक वृत्तवाहिन्यांना देशात काय समस्या आहेत व काय काय घटना सुरू आहेत, याचे विस्मरण झाले होते. गावाकडील शेतकरी, कष्टकऱ्यांच्या पोरांच्या हाताला काम नाही, म्हणून त्यांची लग्न होईनात. प्रत्येक गावात अशी कितीतरी उपवर पोरं आहेत; पण ते छोट्या पडद्यावर कसे काय दाखविणार? स्वतःच्या लाडक्या मुलाला खूश करण्यासाठी हा लग्न सोहळा होता की, भारतातील जनतेला आपली 'श्रीमंती' दाखविण्यासाठी होता, हेच कळत नव्हते. अशा श्रीमंतांचे लग्न पाहून गरिबांचा जळफळाट होईल, अशी परिस्थिती या देशात आता शिल्लक राहिलेली नाही. मुळातच काही दिवसांनंतर या देशात 'आहेरे' आणि 'नाहीरे' या दोन वर्गांतील दरी कमालीची वाढल्याशिवाय राहणार नाही.

या लग्नासाठी देशातील करोडो लोकांचे 'आर्थिक' योगदान आहे. या लग्न सोहळ्यासाठी देशातील सर्वोच्च पदावर असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापासून आंतरराष्ट्रीय जगतातील अनेक सेलिब्रिटी येऊन गेले. राहुल गांधींनी यादरम्यान मणिपूरमधील गोरगरिबांच्या घरी भेट देणे पसंत केले; परंतु त्याचा या लग्न सोहळ्यावर काय परिणाम होणार होता? ज्याला यायचे होते ते आले. ज्याला जायचे नव्हते ते गेलेच नाही, असे म्हटले जात आहे. अर्थात अंबानींची कन्या ईशाचा विवाह आनंद पिरामल यांच्यासोबत होताना सातशे कोटी इतका खर्च झाला होता. त्या घटनेला पाच वर्षे होऊन गेली. असे म्हणतात की, त्या लग्नात ईशाने ९० कोटी रुपयांचा लेहंगा घातला होता.

कालच्या लग्नातील 'रिटर्न गिफ्ट'ची चर्चा जोरात होत आहे. राज्यातील राजकीय नेत्यांना या विवाह सोहळ्याची लग्नपत्रिका जरूर मिळाली; पण त्या लग्न पत्रिकेबरोबर काय 'गिफ्ट' मिळाले, याची चर्चा मात्र प्रसारमाध्यमे करायला तयार नाहीत. भारतात कितीही गरिबी असली तरी गरीब व श्रीमंतांची दरी दिवसेंदिवस वाढतच आहे. यापूर्वी देखील सुब्रतो रॉय, प्रमोद मित्तल, संजय हिंदुजा, जनार्दन रेड्डी, सुनील वासवानी, विराट कोहली आणि अनुष्का शर्मा अशा परिवारातील विवाह सोहळे असेच थाटात झाले होते. अनेकांनी आपले विवाह समारंभ अन्य देशांत साजरे केले होते. अर्थात अंबानींच्या मानाने हे विवाह सोहळे आर्थिकदृष्ट्या तसे तोकडेच म्हणावे लागतील. ज्यांना या लग्न सोहळ्याचे निमंत्रण मिळाले ते स्वतःला भाग्यवान समजत असले, तरी महाराष्ट्रातील तमाम जनता मात्र एका वेगळ्याच सोहळ्यात मग्न झाली होती, हेदेखील येथे नमूद करावे लागेल. कारण ज्या सोहळ्यात महाराष्ट्रातील जनता मग्न झाली होती, तेथे कोणत्याही प्रकारचे इव्हेंट मॅनेजमेंट नव्हते. कोणालाही निमंत्रण नव्हते, तरी सारे हजर होते. कोणत्याही प्रकारची जाहीरात करण्यात आली नव्हती, तसेच कुठलीच भंपकबाजी दिसत नव्हती. कोणालाही कसलेही प्रलोभन नव्हते व 'रिटर्न गिफ्ट'ही नव्हते. कोणाचा कोणावरही राग- रूसवा नव्हता. आपल्याला कोण खायला घालेल की नाही, ते पण माहीत नव्हते. तरीदेखील भरपेट व्यवस्था झाली होती. आज मिळालय उद्या मिळेल की नाही, याची चिंतादेखील नव्हती. खिशात एक रुपयाची पण गरज नसते. तरीही संपूर्ण कार्यक्रम निर्विघ्न पार पडतो. त्या कार्यक्रमात कुठलंही गालबोट लागत नाही. इहलोकी यापेक्षा मोठा सोहळा जगभरात नसल्याची जाणीव होते. म्हणूनच कोठेच गर्वाचा, अहंकाराचा लवलेशही नसतो. देदीप्यमान, नेत्रदीपक सोहळा असतो. डोळ्याचं पारणं फेडणारा, ऊर भरून आणणारा सोहळा असतो. श्रीमंतच नाही, तर गर्भश्रीमंत सोहळा असतो. अगदी कुबेराच्या श्रीमंतीलादेखील लाजवणारी श्रीमंती पहायला मिळते आणि हा सगळा अट्टाहास कशासाठी तर फक्त पांडुरंगाचे मुखदर्शन व्हावे यासाठी. एका बाजूला अंबानींच्या 'श्रीमंती'ची चर्चा, तर दुसऱ्या बाजूला पंढरपूरच्या वारीतील 'श्रीमंती'ची चर्चा. आता जनतेने सांगावे खरी 'श्रीमंती' कोणत्या ठिकाणी होती?

### मनाचिये गुंती

# चातुर्मास आणि आपण



**वैशाली पाटील**
9420350171

गेल्या आठवड्यापासून आपल्याकडे चातुर्मास सुरू झाला आहे. हिंदूंमध्ये चातुर्मासाचे मोठे महत्त्व आहे. हिंदू पंचांगानुसार, हा तपश्चर्येचा काळ आहे. विविध पूजा विधी, उपवास आणि सण, उत्सव यांचा. या चार महिन्यांत भगवान विष्णू क्षीरसागरात झोपायला जातात. देवांच्या या निद्राकालात असुर प्रबळ होतात आणि मानवाला त्रास देऊ लागतात. 'असुरांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी प्रत्येकाने काहीतरी व्रत अवश्य करावे', असे धर्मशास्त्र सांगते- त्यामुळे अनेक लोक आपापल्या सोयीनुसार व्रते स्वीकारतात..जसे सत्कर्म करणे, सत्कथा ऐकणे, सत्पुरुषांची सेवा, संतदर्शन, दानधर्म इत्यादी. जेणेकरून आपली पापे नष्ट व्हावीत.. प्रत्येकाची धर्माविषयी, देवाविषयी स्वतंत्र अशी भावना असते. ती प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे..पण आजच्या आधुनिक युगात आपण आपले अध्यात्म हे विज्ञान आणि परोपकार यांचा समतोल साधून केले, तर ते अधिक योग्य ठरेल...परंपरागत त्याच त्या रूढी, नियम यांना धरूनच पुढे जाणे म्हणजे पापक्षालन नव्हे. सारासार विचार केला, तर आपल्या प्रत्येक पूजेमागे, सणामागे किंवा रूढीमागे नक्कीच विज्ञान आहे; पण आपण त्याकडे न बघता फक्त कर्मकांड करीत राहतो.

अध्यात्म आणि धर्म या दोन्ही बाबी संस्कृतीचाच भाग आहेत. मानवापेक्षा श्रेष्ठ देव, ती ऊर्जादायी शक्ती असते हे आध्यात्मिक माणूस मानतो; पण अध्यात्म आणि धर्म एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्या, तरी समान नाहीत. धर्म माणसाला जगण्याचा मार्ग दाखवतो. अनेकदा धार्मिकता ही रूढी-परंपरा, पूजा-अर्चा, प्रार्थना यांतून व्यक्त होते. याउलट आध्यात्मिकतेला कर्मकांडाचे बंधन नाही. यासाठी आपण अध्यात्म स्वीकारले पाहिजे...व्रत, नियम पाळावेच कारण त्यातून आपल्यात संयम आणि आत्मविश्वास वाढीस लागतो..पण हे नियम, व्रत देवापुढे रांगोळी, तुलसी अर्पण, विष्णू नामावली, एक अन्न भक्षण इत्यादीपर्यंतच मर्यादित असू नये..या व्रताने नुकसान कोणाचेच होत नाही; पण यासोबतच निसर्गाला, मानवाला आणि स्वतःलाही हितकारक आणि प्रेरणादायक ठरेल, असे व्रत स्वीकारले पाहिजे..चार महिन्यांत मी स्वतःला शारीरिकदृष्ट्या सुदृढ बनवेल...मी कोणालाही दुखावणार नाही, मी कोणाला फसवणार नाही, खोटे बोलणार नाही, मी निसर्गाच्या सान्निध्यात जगेल, त्याची हाक ऐकेल, त्याला इजा होईल असे वागणार नाही, निसर्गाची पूजा आणि संवर्धन करेल, माझ्यातील सुप्त गुणांना मी शोधेल आणि त्यामार्फत स्वतःचा उत्कर्ष करून घेईल आणि सर्वात महत्त्वाचे माझे आई-वडील, सासू- सासरे यांचा आदर करेल, त्यांची सेवा करेल...खूप अशी नियम- व्रते सांगता येतील जी आपण स्वीकारली, तर पिढीजात धार्मिक पुस्तकातील व्रते नाही केली तरी देव आपल्याला नक्की पावणार आहे..त्याची कृपा आपल्याला आपण न मागताही लाभणार आहे..शेवटी परमेश्वरालाही परोपकार आणि निस्वार्थी जगणेच आवडत असते..परमार्थाला पोषक गोष्टींचा विधी आणि प्रपंचाला मारक गोष्टींचा निषेध, हेच चातुर्मासाचे वैशिष्ट्य आहे. ते खऱ्या अर्थाने जाणून घ्यायला हवे. धार्मिक ग्रंथांचे वाचन, निरूपण करणे, जप, नामस्मरण यातून मन शांत करणे, ध्यानधारणेतून मनशक्ती वाढवणे हे सगळे योग्यच आहे; पण या काळात थोर व्यक्तिमत्त्वांची पुस्तके, सकारात्मक विचारधारा असलेली पुस्तके यांचे अवांतर वाचन करून 'स्व'चा शोध घेतला, तरी उत्तम व्रत होऊ शकते.. शेवटी प्रत्येकाची आत्मिक सुखासाठी धडपड सुरू आहे. तेव्हा आपल्यातल्या ऊर्जाशक्तीच्या जोरावर आपण आयुष्य किती भरभरून जगतो, आपण सकारात्मक दृष्टीकोन कसा जोपासतो, स्वतःमधली क्षमाशील वृत्ती जागृत ठेवून इतरांनाही क्षमाशील होण्यास कसे प्रवृत्त करतो, यासाठी आधुनिक अध्यात्म शिकणे आवश्यक आहे. आणि म्हणूनच नव चैतन्याच्या मार्गाचा अवलंब करायला हवा. कर्मकांडे तात्पुरती बाजूला सारून खरे अध्यात्म जगायला हे चार महिने पुरे आहेत..आणि ते जर शिकलो, तर ते आत्मिक सुख आपणास आपण जिवंत असेपर्यंत पुरणार आहे...

### वाचक विचार मंच

## पाकिस्तानात महागाईने गाठला कळस!

पाकिस्तानमध्ये अनेक वस्तूंचे भाव गगनाला भिडले आहेत. एका बातमीनुसार पीठ ८०० रुपये किलो, तर तेल ९०० रुपये किलो एवढ्या चढ्या भावाने विकले जात आहे. तेथील रुपयासुद्धा जागतिक विनिमयात कोसळला आहे. आरोग्य सुविधा, शिक्षण इत्यादीसाठी पैसे कसे उभे करावेत, या चिंतेत पाकिस्तानातील जनता आहे. ही महागाई सतत वाढत असताना राज्यकर्ते मात्र परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यास समर्थ दिसत नाहीत.जाणकारांच्या मते पाकिस्तानात अर्थव्यवस्थेचा विकास दर २.३८ टक्के एवढाच टप्पा गाठू शकतो. येत्या काही काळात तब्बल ९७०० अब्ज रुपयांच्या कर्जाची परतफेड करावी लागणार आहे. आणि या सर्व परिसितीवर चीन आपली नजर ठेवून आहे. पाकिस्तान आपल्या जाळ्यात कसा येईल, याचे मनसुबे चीन आखत आहे. शेवटी असाहाय्य स्थितीत सापडलेल्या पाकिस्तानला चीनला सामोरे जावेच लागेल, असे दिसते आहे.

**शांताराम वाघ**, पुणे, मो. नं.: ९६२३४ ५२५५३

## 'खेडकर प्रकरण', अशी अजून किती असतील...?

१८ जुलै २०२४ रोजी, महायुती सरकारने राज्य शासनाच्या अखत्यारीतील सर्व शासकीय कार्यालयांतील संवर्गातील पदे सरळ सेवेने लोकसेवा आयोगामार्फत भरण्याचा निर्णय घेतला आहे. त्याबद्दल विद्यार्थीवर्ग त्यांचे स्वागत करतो; परंतु प्रश्न हा आहे, की जर केंद्रीय लोकसेवा आयोगावर खेडकर प्रकरणाने प्रश्न निर्माण होऊ शकतात, तर मग भविष्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगावर प्रश्न निर्माण होणार नाहीत, याची खात्री कोण घेईल. केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा जगात कठीण म्हणून ख्याती आहे; परंतु त्याला गालबोट लावण्याचे काम या खेडकर प्रकरणाने केले आहे. गर्भ श्रीमंतांची मुले जर बाजारातील सर्टिफिकेट्स, असे टेबलाखालून दाम देऊन खरेदी करून गरीब मुलांच्या 'पोस्ट' चोरत असतील, तर अशा आयोगावर आम्ही विश्वास कसा ठेवावा? आता तर असे वाटत आहे की, हे एक प्रकरण समोर आले आहे; परंतु अशी कितीतरी प्रकरणे असतील जी उजेडात पांढरे कपडे घालून मिरवीत असतील. आमची सरकारकडून हीच अपेक्षा आहे, की अशी जितकी प्रकरणे भूतकाळात झालेली असतील ती सर्व बाहेर काढून गरीब विद्यार्थ्यांना न्याय द्यावा.

**मनोज सीताराम हानोरे**, शिर्ला, जि. अकोला
मो. नं.: ७३८७९८८६२८

**कुतूहल**

सांगा ना पूजाताई
कुठे आहेत पप्पा?
कसं व्हावं आयएएस
ह्याविषयी मारू म्हटलं गप्पा
कसा करावा बदल
वय अन् नावात?
कशी जमवावी संपत्ती
वेगवेगळ्या गावांत?
मीडियावरील चर्चेने
झालंय कुतूहलाचं वेदर
ह्याबाबत पोलिसांना
करायचं गेट टू गेदर
कुठून आलं मम्मीत
बदूक रोखण्याचं डेअरिंग?
अंबर दिवा लावून कसं
फिरवावं ऑडीचं स्टेअरिंग?
मावशी म्हणाली पेंद्या
प्रश्न पडला आजच्या घडीला?
मम्मी, पप्पांनी कोणता
संदेश द्यावा भावी पिढीला?

**ॲड. अनंत खेळकर**, अकोला

### संवाद

## फास्ट फूडचा वापर कमी करा..!



सध्या मुलांमध्ये लठ्ठपणा आणि कॅन्सर होण्याचे प्रमाण वाढले आहे. याबाबतचा अहवाल नुकताच प्रकाशित करण्यात आला. संशोधकांनी असा दावा केला आहे, की फास्ट फूडमुळेच मुलांमध्ये लठ्ठपणा आणि कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. आहारातील घटकावर आपले आरोग्य अवलंबून असते. आपण रोज चौरस आहार घ्यावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा, असे आहारशास्त्र सांगते. विशेषतः शाळकरी मुलांना तर फास्ट फूड म्हणजे पर्वणीच वाटते. जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफूडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण खूप असते. शिवाय ते भरपूर तळलेलेदेखील असतात. अनेक प्रक्रिया केलेल्या या पदार्थांत कोणतेही पौष्टिक घटक नसतात. त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहण्याचा सल्ला डॉक्टर व आहार तज्ज्ञ वारंवार देत असतात. तरीपण मुलांच्या लाडाच्या आहारी जाऊन आपण त्यांचे ऐकतो.

साधारणतः दोन वर्षांपूर्वी एका फास्ट फूड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते, की ही कंपनी तयार करीत असलेल्या सर्व पदार्थांमध्ये व शीतपेयामध्ये ६० टक्केदेखील पोषक घटक दिसून येत नाहीत.

अति प्रमाणात फास्ट फूड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि लठ्ठपणा यांचा धोका वाढत जातो, अति प्रमाणात फास्ट फूड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजार होऊ शकतो, हे आता संशोधनाने सिद्ध झाले आहे. त्यामुळे आतातरी पालकांनी मुलांना फास्ट फूडपासून दूर ठेवायला हवे.

यासाठी मुलांच्या दररोजच्या आहाराचा एक चार्ट बनवायला हवा व त्याचे पालन पालक व पाल्य या दोघांनीही करायला हवे, तसेच या चार्टमध्ये फास्ट फूड ऐवजी दूध, अंडी, मासे, पोळी, पराठे, चटणी, कडधान्य उसळ, पोहे, उपमा, दही, तूप यांसारख्या पौष्टिक पदार्थांचा समावेश करावा. या चार्टचे पालन पालकांनीदेखील तेवढेच करावे जेवढे मुलं करत आहेत, म्हणजे मुलांवर एक चांगला परिणाम होऊन मुले योग्य सवयी लावून घेण्यास प्रवृत्त होतात. म्हणजे एक प्रकारे मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

**सूर्यकांत लच्छीराम दासरवार**
केंद्रप्रमुखः जि.प.केंद्र प्रा.शा.अंबुलगा (बु), ता. मुखेड

### गुल्लेर

# दे हाकालून!



**नरेंद्र इंगळे**
9561226572

'कुत्रे काहून भुकून राह्यले निम्मेराती?'

'भूकू दे.. झोप मुकाट्यानं.'

'आपल्या घरापाशीच भुकून राह्यले..असे कुत्रे भुकले की मले लय भेव लागते.'

'भेव कायचा आहे? मी आहो ना तुह्यापाशी.'

'तुम्ही काय कामाचे? चोरानं एक रट्टा देला की चार जागी पडता.'

'तू झोप अन मलेही झोपू दे.. अळीच वाजले.'

'चोर असतीन काय?'

'आपल्या घरात काय सापडते चोराले? कंटोलचे गहू नेईन काय लेकाचा?'

'माही पोथ हाय पेटीत! खिडकीतून पहा बरं..'

'अंधार हाय बाहीर.. काहीच दिसत नाही. बारीक पानी येऊन राह्यलं..'

'एखांदा धट मानूस काळी घेऊन जात होता अन पाहून येत होता.'

'कुत्रे खंब्याखाली भुकून राह्यले.. आपल्या घरापाशी नाही.'

'तसेही लय पोचट आहा तुम्ही..बातच दम लागते तुमाले..मले वाटते चोरच आहेत.. तसे कुत्रे भुकतच नाहीत. फोन लाऊन पाहा सुरेसले.'

'इतक्या राती कोनी फोन लावत असते काय? लोकं आपापल्या घोरात असतात. दुसऱ्याची झोपमोड होते.'

'त्याच्याच घरापाशी कुत्रे भुकून राह्यले. जागीच हाय तो.'

'जागी असता त त्यानं कुत्रे हाकलले नसते काय?'

'मंग कुत्रे काहून भुकून राह्यले?'

'तसेच भुकून राह्यले.'

'तुमाले काय दिसलं खिडकीतून?'

'अंधारकूट दिसला. खंब्यावरचा लाईट गेला.'

'मीच जाऊन पाहून येतो.'

'राहू दे.. शानपना करु नको.. रिकामी वली होशीन.. बारीक पानी सुरू आहे.'

'सगळेजनं गार झोपीत आहेत. नक्की चोर डल्ला मारतात कुठीतरी.. बरं जाऊनच पाहा.. मी दारात उभी राह्यतो.. हे काळी न्या हाती.'

'कुत्रे भुकले म्हनून दोघंतिघं उठले.. काय झालं रे सुरेस? कुत्रे काहून भुकून राह्यले?'

'काहीच नाही.. तिकडच्या पुऱ्यातली एक जवान कुत्री भटकून इकडे आली. तिले पाहून पाच-सहा कुत्रे जमा झाले.. अन एकमेकाच्या आंगावर भुकून राह्यले.'

'घ्या महाराजा.. आम्ही म्हनून चोर व्हय.. दे हाकालून..'

# केज तालुक्यात बेसुमार वाळू उपसा!

## प्रशासन अन् माफियांची मिलीभगत • लाखोंच्या महसूलला लागतोय चुना • सगळे एकाच माळेचे मनी,कारवाई होईल कशी? • हप्तेखोरीमुळे माफियांवर कारवाई होईना?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

पींपरी ,आढाळा, बोरगाव,भोपला ,वरपगाव येथील गावच्या परीसरात नद्या गेल्या आहेत व या सर्व नद्या मांजरा नदीला मिळालेल्या आहेत तरी या छोट्या मोठ्या नदी पात्रातुन अवैध्य वाळू उपसा दीवस ,रात्र वाळुमाफीया बेसुमार सुमारास वाळु सुरू आहे.वाळु तस्करांच्या बातम्या अनेक दैनिकांमधून प्रसारित करून शासन व प्रशासनाला जागे करण्याचे काम सातत्याने प्रयत्न करण्यात आले पन केज तालुक्यातील पींपरी, आढाळा, बोरगाव,भोपला ,वरपगाव येथील नदी पात्रातील अवैध्यरित्या वाळूचा उपसा रात्र,दीवस सुरूच आसतो व वाळुमाफीयांना कुठल्याही प्रकारची भीती नाही कींवा प्रशासन या अवैद्या रित्या होत असलेल्या वाळु उपस्यावर कुठल्याही प्रकारची ठोस कारवाई करत नाही तसेच वाळु माफीयान विषयी नागरिकांन मध्ये असे चर्चा सत्र सुरू झाले आहे की वाळुमाफीयांन मध्ये असे बोलले जाते की आम्ही कुनाला भीनार नाही आमच्या वर कारवाई



होत नाही कारण आम्ही हप्ता दीलेला आहे जर संमंधीत प्रशासन हप्ता घेऊन वाळु माफीयान वाळु काढण्यासाठी परवानगी देत असेल तर शासनाचा पगार संमंधीत अधिकारी घेतात कशाला व प्रशासन आहे कशाला असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे तरी केज तालुक्यातील पींपरी, आढाळा, बोरगाव, भोपला वाळू नदी पात्रातुन राज रोज पणे रात्रीच्या वेळी चालू असते वाळू तस्करांनी नदी पात्र पोखरुन टाकली आहे. त्यामुळे प्रशासनाचा कोट्यावधीचा महसूल बुडवला जात आहे व कारवाई करणारे अधिकारी हप्ता घेऊन मंडळ अधिकारी लाट झाले आहेत असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.केज तालुक्यातील अवैद्य वाळू तस्करी स्थानिक प्रशासनाच्या डोळ्यासमोर होत असताना सुद्धा जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. केज तालुक्यातील अवैध वाळू तस्करी च्या बाबत कोणताही मंडळ अधिकारी तलाठी कारवाई करण्यास घाबरतात असे तालुक्यातील चित्र आहे. विशेष म्हणजे याबाबत माहिती जिल्हाधिकारी पोलीस अधीक्षक उपविभागीय अधिकारी तहसीलदार ठाणेदार यांना माहीत असून सुद्धा शून्य आहे. रात्रीच्या कारवाई च्या वेळी सुद्धा वाळू तस्करी चालू आहे ही नेमकी कोणाच्या आर्शिवादाने पान २ वर...

## मराठा आरक्षणासह तीर्थक्षेत्र निधीसाठी उपोषण!

रोहन गलांडे : आता मेलो तरी हरकत नाही



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठ्यांचे दैवत श्री. मनोज जरांगे पाटील हे २० जून २०२४ पासून आंतरवाली–सराटी जि. जालना या ठिकाणी आमरण उपोषणास बसणार आहेत.तरी मराठ्यांचे दैवत श्री. मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या विषयी महाराष्ट्र राज्य शासनाची भूमिका उदासिनतेची दिसून येत आहे. तरी मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या २० तारखे पासुन सुरू होणाऱ्या उपोषणाची दखल घेऊन राज्य सरकारने केलेल्या मराठा समाजाच्या सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनात दि.२४/०७/२०२४ रोजी श्री संत नामदेव महाराज सभागृह येथे सकाळी १२ वाजता रोहन गलांडे पाटील आमरण उपोषणाला बसणार आहे मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहील असे निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे. तसेच चिंचोली माळी येथील श्री संत नामदेव महाराज मंदिरासाठी तीर्थक्षषासाठी ५० लाख रुपये मंजूर झालेल्या निधीचे वितरण करून पान २ वर...

> सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मुंडे यांनी लेखी आश्वासन देऊन श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास कामाला सुरुवात केली नाही तरी यांच्या वर कायदेशीर कारवाई करण्यात यावी कारवाई होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण.

## धारेश्वरच्या धबधब्यात तोल जाऊन मृत्यू!

दुःखद : सोयगाव तालुक्यातील पर्यटन स्थळावरील घटना



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

निसर्ग सौंदर्य लाभलेल्या धारेश्वर धबधब्यात पाय घसरून पडल्या मुळे एकाचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी अकरा वाजता उघडकीस आली आहे रविवारी सायंकाळी सदर अविवाहित तरुणाचा धबधब्यात पाय घसरला व तो कुंडात पडल्याची घटना घडली होती त्यानंतर १७ तासांनी सोमवारी सकाळी अकरा वाजता त्याचा मृतदेह धारेश्वर धबधब्याच्या कुंडाच्या कपारीत आढळून आला आहे.

गौरव किसन नेरकर( वय २०) रा खंडेराव नगर जळगाव असे मृत अविवाहित तरुणाचे नाव आहे जळगाव शहरातील गौरव सह १६ जणांचा एक समूह रविवारी सायंकाळी सहा वाजता सोयगाव तालुक्यातील धारेश्वर धबध्या जवळ मुक्कामासाठी आले होते रात्रभर मुक्काम करून पहाटे सकाळीच दर्शन घेवून सोमवारी त्यांचा परतीचा प्रवास होणार होता दरम्यान त्यातील एक अविवाहित तरुण हात पाय धुण्यासाठी जातो असे सांगून रविवारी सायंकाळी सहा वाजता धबधब्याजवळ भ्रमंती करत असताना त्याचा अचानक तोल जाऊन पाय घसरला व तो धबधब्यात जाऊन पडला एक तास होऊनही तो परतला नसल्याने त्याचे मित्रांनी त्याचा शोध घेतला परंतु तो आढळला नाही त्यामुळे त्यांनी रात्री आठ वाजता बनोटी पोलीस दुरक्षेत्र गाठून गौरव हरविल्याची तक्रार दिली त्यावरून सोयगाव पोलिसांनी संशयावरून गौरवाचा धबधब्यात शोध सुरू केला रात्री एक वाजेपर्यंत पोलिसांनी ग्रामस्थ व पोलीस पाटील सुनील जाधव यांच्या मदतीने रेस्क्यू मोहीम राबविली रात्री एक नंतर रेस्कु मोहिम थांबवून पुन्हा सोमवारी सकाळी सात वाजता सोयगाव चे उपनिरीक्षक रजाक शेख, विकास दुबिले,संदीप सुसर,सतीश बर्डे,राजू बर्डे,यांनी पट्टीचे पोहणारे रामदास जाधव,यांच्या मदतीने, पोलीस पाटील पान २ वर...

## रायमोहा ग्रामपंचायतचे होतेय कौतुक!

धोरण: गावच्या स्वछता, पाण्यावर विशेष लक्ष

रायमोह/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील रायमोहा ग्रामपंचायत म्हणजे संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छता, गावात घनकचरा व्यवस्थापन व सांडपाण्यासाठी सिमेंट नाल्या करणारी ग्रामपंचायत असल्याने,बीड जिल्हा परिषदेच्या पंचायत स्तराव स्युती होत आहे.




रायमोह ग्रामपंचायत पंचायत समिती उपसभापती जालींदर सानप यांच्या नेतृत्वाखाली आल्या नंतर ग्रामपंचायत ने रायमोहा व दगडवाडीत नागरीक सुविधा देण्यासाठी प्रशासन कामास लावले. गावात कचरा गोळा करण्यासाठी घंटागाडी सुरु करण्यात आली.या गाडीचा शुभारंभ ज्ञानेश्वर आश्रम चे ह.भ.प.नारायण डिसले महाराज यांच्या हस्ते करण्यात आली.परिणामी गावात कचरा न होता स्वच्छता राहु लागली. काही अवधीत रायमोहा ग्रामपंचायत च्या प्रशासनाने नागरिकांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणुन आरो प्लँट बसवण्यात येऊन अवघ्या पाच रुपयांत पाणी उपलब्ध करून दिले.रायमोहा ,दगडवाडी,छोटे व्यवसाय, हॉटेल चालकांची पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला.याचे धन्यवाद ग्रामपंचायत ला मिळत आहेत. रायमोहा गावात स्वच्छता अभियानांतर्गत सांडपाण्यासाठी जमीन सिमेंट नाल्या करणारी शिरुर तालुक्यातील रायमोहा ग्रामपंचायत ही एकमेव ग्रामपंचायत आहे. एकुण १५००मिटर सिमेंट नाल्या पुर्ण करण्यासाठी स्वतः जालींदर सानप उपसभापती, पान २ वर...

## रासप मतदार संघाच्या निवडणूक रिंगणात!

अभिनंदनिय : पक्षनिरिक्षक म्हणून डॉ. शिवाजी शेंडगे नियुक्त

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रीय समाज पक्षाच्या मुंबईत झालेल्या बैठकीत प्रदेश सरचिटणीस डॉ. शिवाजी शेंडगे यांची रासप अध्यक्ष महादेव जाणकर यांच्या आदेशानुसार आष्टी मतदार संघाची चाचपणी करण्यासाठी पक्ष निरिक्षक म्हणून पत्राकडे नियुक्ति जाहीर करण्यात आली.



राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जाणकर यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रदेशाध्यक्ष काशिनाथ शेवते, मुख्य महासचिव ज्ञानेश्वर सलगर यांच्या उपस्थितीत राज्यातील जिल्हास्तरिय प्रमुख पदाधिका–यांची मुंबईत बैठक पार पडली. या बैठकीत रासपचे प्रदेश सरचिटणीस डॉ. शिवाजी शेंडगे यांची राजकीयदृष्टी बहुचर्चित असलेल्या आष्टी मतदार संघात पक्ष निरिक्षक म्हणून पक्षाकडून पत्रकाव्दारे नियुक्ति करण्यात आली. राष्ट्रीय समाज पक्षाकडून महाराष्ट्रातील जवळपास १०९ विधानसभा मतदार संघात चाचपणी करण्यात आली. पान २ वर...

## आरक्षण बचाव मेळाव्यास उपस्थित रहा

माधवराव निर्मळ :दिंद्रुड येथे पार पडली बैठक



दिंद्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

ओबीसी भटके व विमुक्त आरक्षण बचाव मेळावा येत्या २४ रोजी धारूर येथे होणार आहे, यानिमित्त धारूर वडवणी व माजलगाव तालुक्यातील ओबीसी समाजाने या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन ओबीसी नेते माधवराव निर्मळ यांनी केले आहे. भोपा येथील नर्मदा जिनिंग येथे सोमवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी ते बोलत होते.

येत्या २४ जुलै रोजी ओबीसी आरक्षण बचावाचे योद्धे लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्या उपस्थितीत धारूर येथील गरड मंगल कार्यालयात ओबीसी, भटके व विमुक्त आरक्षण बचाव मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यास पान २ वर...

## परळीमध्ये कॉंग्रेसची पत्रकार परिषद

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी आगामी होऊ घातलेल्या विधानसभेच्या पार्श्वभूमीवर व परळी तालुका शहराच्या विविध विषयावर बीड काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांची आज मंगळवारी दुपारी ठीक एक वाजता पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली आहे अशी माहिती परळी शहर काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादूर बाई यांनी दिली आहे.



परळी मतदारसंघातील विविध प्रश्नावर व परळी परभणी दुहेरीकरणासाठी वास्तव्यात असणाऱ्या नागरिकासंबंधी, तसेच होऊ घातलेल्या विधानसभेच्या पार्श्वभूमीवर या पत्रकार परिषदेकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. राजेसाहेब देशमुख या पत्रकार परिषदेत काय भूमिका मांडणार याकडे संपूर्ण परळी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांचे लक्ष लागून पान २ वर...

## गुरुमुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रांती घडून येते

डॉ.अरुण चव्हाण : महिला महाविद्यालयात गुरु पोर्णिमा



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

गुरुंमुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात क्रांती घडून येते, गुरू विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन प्रा डॉ अरुण चव्हाण यांनी केले. येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात गुरुपौर्णिमे निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

शहरातील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने गुरुपौर्णिमे निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्येची देवता माता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन संस्थेच्या पान २ वर...

## नितीन सोनवणे | ऑल इंडिया पँथर सेनेकडून आंदोलन

# अन्यायाच्या विरोधात धडकला मोर्चा

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

भूमिहीन दलित शेतमजूर महिलांना झालेल्या मारहाण प्रकरणातील आरोपींना अटक झाली पाहिजे माजलगाव तालुक्यातील राजेगाव येथील महिलांना मारहाण व विनयभंग करून त्यांच्यावर अन्याय केला आहे माजलगाव बीड महाराष्ट्रातील घटनांबाबत व मूलभूत प्रश्नांबाबत निवेदन माजलगाव तहसीलदार यांना राजेगाव पिडीतांना न्याय मिळाला पाहिजे आरोपींना अटक झाली पाहिजे पिडीतांना पोलीस संरक्षण द्यावे

या साठी तहसील कार्यालय माजलगाव येथे मोर्चा काढुन तहसील समोर भाषणे झाले. भाषणा मध्ये ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाई केदार म्हटले दलित अत्याचार ही राष्ट्रीय संपत्ती घोषीत




करा. नैतिकतेच्या आधारावर ग्रहमंत्र्यांनी सर्व प्रकरणांना न्याय द्या अन्यथा पदाचा राजीनामा द्या.

अन्यथा चार दिवसा नंतर ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने बीड सोलापूर नेशनल हायवे वर रस्ता रोको आंदोलन केले जाईल.

दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेअंतर्गत या महिलांना जिल्हा व तालुक्यातील भूमिहीन दलितांना तात्काळ जमीन द्यावी अल्पवयीन १४ वर्षीय कोल्हाटी समाजाच्या गरीब मुलीवर माजलगाव येथील लॉजवर बलात्काराची घटना गंभीर आहे बेकायदेशीर लॉजिंग बंद करावी आरोपींनवर कठोर कारवाई करून सदरील मुलीला शिक्षण व नोकरीची तरतूद करून तिचे पुनर्वसन करावे.

विशाळगड दंगलीतील दंगलखोरांना अटक झाली पाहिजे नुकसान झालेल्या ग्रामस्थांचे नुकसान भरपाई देण्यात यावी आरोपीवर युएपीए क्ट अंतर्गत कारवाई करावी महाराष्ट्रात दलित हत्याकांड अत्याचार वाढले आहेत .सातारा,येवला,लातूर, सांगोला बीड,अमरावती राज्यभर अत्याचार वाढत आहेत तात्काळ महाराष्ट्र दलित अत्याचार ग्रस्त पान २ वर...

## भारतीय हितकारणी संघाची स्थापना




औरंगाबाद/पुण्यभूमी प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या पहिल्या संघटनेला अर्थात बहिष्कृत हितकारणी सभेला २० जुलै २०२४ रोजी शंभर वर्ष पूर्ण झाली. या शताब्दी वर्षानिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे संविधानिक कार्य पुढे घेऊन जाण्यासाठी भारतीय हितकारणी संघाची स्थापना करण्यात आली. याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष सिद्धार्थ शिनगारे यांनी सविस्तरपणे आपली भूमिका मांडली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शोषित समाजासाठी जवळपास ७० संविधानिक हक्क अधिकाराची मागणी केली होती, त्यापैकी ७ च अधिकार संविधानात आले, परंतु ६३ हक्काधिकार संविधानात समाविष्ट करण्यात आलेले नाहीत. ७ अधिकाराचे रक्षण करून राहिलेल्या ६३ साठी संघर्ष करणे म्हणजे आंबेडकरी चळवळ होय असे मत सिद्धार्थ शिनगारे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य रमेश दादा गायकवाड पान २ वर...